**नियमित फौजदारी खटला क्र. ११/२०२४**
**महा. शासन वि. अमोल पोवार**
**निशान क्रमांक- १४/क**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक- १ ची जबानी)**
मी देवाशपथ खरे सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | प्रदिप धोंडीराम पोवार |
| वय | - | २९ वर्षे |
| व्यवसाय | - | शेती व नोकरी |
| पत्ता | - | बारडवाडी, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**शासनातर्फे सरतपासणी विशेष सरकारी अभीयोक्ता श्री. एस. बी. कांबळे यांचे तर्फे शपथेवर पुढे सुरु-**

**१.** आरोपी क्र. १ हा माझा चुलत भाऊ व आरोपी क्र. २ हे माझे चुलते असल्यासने मी त्यांना ओळखतो. माझे घराशेजारी मडकेरान या नावाने शेती आहे. कोणत्या तारखेला काय झाले होते हे मला आठवत नाही. आमचेत व आरोपीत काहीही घडलेले नाही. आता मला फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. तो मी वाचून पाहिला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर माझे माहितीचा नाही. सहीस **निशाणी P15/PW1** देण्यात येते.

**साक्षीदाराने अभीयोग पक्षास सहकार्य न केलेने विशेष सरकारी अभीयोक्ता एस. बी. कांबळे यांनी साक्षीदारास उलटतपासणीत विचारले जाणारे सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, आमचेत व आरोपीत मडकेरान या शेतावरून वाद आहेत. हे मला आठवत नाही की, दि. २१/०७/२०२३ रोजी सायंकाळी ५:३० चे सुमारास मी, माझे आई-वडील आणि बहिण हे मडकेरानातून रोप लावून आलो किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ हे आम्ही रोप केलेल्या शेतामध्ये नांगद जोडून नांगरणी करून पुन्हा रोप लावत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस तिथे जाऊन आम्ही लावलेले रोप का विसकटता असे विचारले. हे म्हणणे

खरे नाही की, सदरील वेळी आरोपी यांनी मला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा आमच्या भांडणाचा आवाज ऐकून माझे आई-वडील व बहिण भांडण सोडविण्याकरिता आले असता आरोपी क्र. १ याने माझे वडीलांच्या पायावर काठी मारली व पाठीत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळीस माझे बहिणीच्या डाव्या हातावर आरोपी क्र. १ ने काठी मारली व आई बहिणीला आरोपी यांनी वाईट वंगाळ शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, सदरील वेळी आरोपी क्र. १ ने मला सोडणार नाही अशी धमकी दिली. आता मला माझ्या जबाबातील **अधो. भाग अ** वाचून दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो माझ्या जबाबात का नमुद आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी व आरोपींची कोर्टाबाहेर आपआपसात तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मदत करण्यासाठी आज रोजी मी कोर्टात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस. आर. भांदिगरे वकील यांनी नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी.
Sd/-

दि. २५/०२/२०२६

**(एन. पी. काकडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र. २), राधानगरी